**तातडीचे/महत्त्वाचे**

जा.क्र.आस्था-1/विधी अधिकारी/भरती/2018
पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे कार्यालय,
2, साधु वासवानी रोड, जीपीओ शेजारी,
दूरध्वनी क्र.: 020-26208301
पुणे, दिनांक : 11/1/2018

---

प्रति,

सहायक संचालक (माहिती),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
तळमजला, मंत्रालय, मुंबई-32

संदर्भ :- ह्या कार्यालयाचे पत्र क्र.आस्था-1/विधी अधिकारी/भरती/32017/2554, दिनांक 26/12/2017

विषय :- जाहिरातीचे शुध्दीपत्रक प्रसिध्द करणेबाबत..

......0.....

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, पोलीस आयुक्त, पुणे शहर आस्थापनेवर विधी अधिकारी (गट-अ) आणि विधी अधिकारी यांची पदे भरण्यासाठी आपलेमार्फत दिनांक 28/12/2017 रोजीचे पुणे, नाशिक व सोलापूर येथील वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर जाहिरातीचे अनुषंगाने प्रसिध्द करावयाचे **शुध्दीपत्रक** सोबत जोडले आहे. तरी सदरचे शुध्दीपत्रक वर्तमानपत्रांमध्ये कृपया प्रसिध्दीस देण्यात यावे, ही विनंती.

1. कार्यालयाचे नाव :- पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे.
2. शुध्दीपत्रक प्रसिध्दीचा दिनांक :- दि.12/1/2018
3. बील कोणाकडे पाठवावे :- पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे.
4. जाहिरातीचे स्वरुप :- विधी अधिकारी पदे कंत्राटी पध्दतीने भरणे.
5. कोणत्या क्षेत्रात सदरचे कार्यक्षेत्र येते :- पुणे/नाशिक/सोलापूर (राज्यस्तर)
6. शुध्दीपत्रक किती वेळा प्रसिध्द करावयाचे :- एक वेळ.
7. किती वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाचे :- दै.सकाळ, दै.लोकमत.

# शुध्दीपत्रक

पोलीस आयुक्त, पुणे शहर, सोलापूर शहर आणि नाशिक शहर आस्थापनेवर विधी अधिकारी (गट-अ) ची प्रत्येकी 1 याप्रमाणे एकूण 3 पदे आणि पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यालयासाठी विधी अधिकारी यांची 2 पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी दिनांक 28/12/2017 रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात आली आहे. तसेच त्याबाबतच्या अटी, शर्ती व सविस्तर जाहिरात पो.आ.,पुणे शहर कार्यालयाच्या www.punepolice.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर जाहिरातीमध्ये **"शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा"** या शिर्षकाखाली विधी अधिकारी गट-अ या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी 45 वर्षांपेक्षा जास्त नसेल असे नमूद करण्यात आले आहे. त्याऐवजी "विधी अधिकारी (गट-अ) या पदावर नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा 62 वर्षे आणि विधी अधिकारी या पदावर नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा 60 वर्षे" अशी दुरुस्ती करण्यात येत आहे. इतर अटी व शर्ती कायम आहेत.

तसेच उमेदवारांना अर्ज सादर करण्यास दि.20/1/2018 पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.